MHNS110003172025

**नियमित दिवाणी दावा क्र.२४/२०२५**
**इंदुबाई खालकर व इतर वि. भास्कर कर्पे व इतर**

**निशाणी ५ वरील आदेश**
**(आदेश पारीत दिनांक २४.०४.२०२५)**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींनी मिळकत गट क्रमांक १३८ मधील सामाईक विहीरीतील पाणी पिकांना घेण्यास, मोटार पंप चालु करण्यास अडथळा करु नये, इलेक्ट्रिक मोटारचे वायरी तोडु नये व फ्युज काढु नये असा तुर्तातूर्त ताकीद मिळण्याकरीता केला आहे.

**२.** वादीचे थोडक्यात कथन की, गट क्रमांक १३८, १०६, ३११ व ३१२ या शेत मिळकती त्रंबक यशवंत कर्पे, रामनाथ यशवंत कर्पे व जगन्नाथ यशवंत कर्पे या तीन भावांच्या वडिलोपार्जित मालकी हक्काच्या व कब्जे वहिवाटीच्या अशा आहेत. या मिळकतींचे वाटप करुन मिळणेकामी त्रंबक व रामनाथ यांनी जगन्नाथ चे विरुध्द निफाड येथील दिवाणी न्यायालयात स्पे.मु.क्र.२३२/१९९८ दाखल केला होता. सदर दाव्यात उभयतांमध्ये दि.१७.०२.२०२० रोजी आपआपसांत समझोता होवुन तसा हुकुमनामा झालेला आहे. सदर हुकुमनाम्याप्रमाणे गट क्रमांक १३८ मध्ये पश्चिम बाजुने ०.०२ आर क्षेत्र सामाईक विहीरसाठी व गट क्रमांक १०६/१/१ पैकी ०.४१ आर क्षेत्र त्रंबक यशवंत कर्पे यांचे वाटे हिश्याला वाटपाने दिलेल्या आहेत. सदर गट क्रमांक १३८ मधील विहीर ही त्रंबक व जगन्नाथ यांची वाटपाप्रमाणे सामाईक वापराची व मालकीची आहे. तसेच गट क्रमांक ३११ व ३१२ ही मिळकत रामनाथ व गट क्रमांक १०६ पैकी १ हे ८० आर मिळकत जगन्नाथ यांचे वाटे हिश्यास दिलेली आहे. त्याप्रमाणे नोंद क्रमांक ९२४ प्रमाणित करण्यात आलेली आहे.

**३.** त्रंबक यशवंत कर्पे हे दि.२८.०९.२०२३ रोजी मयत झाले व त्यांचे नंतर वारस म्हणुन वादी क्रमांक ०१ मुलगी व वादी क्रमांक ०२ पत्नी यांची वारस नोंद २०९७ प्रमाणित झालेली आहे. वादी स्वत: मेहनत मशागत करुन दावा मिळकत गट क्रमांक १३८ मधुन उत्पन्न घेत आहेत. जगन्नाथ यशवंत कर्पे हे मयत झालेले असुन प्रतिवादी क्रमांक ०१ हा त्यांचा मुलगा व प्रतिवादी क्रमांक ०२ ही त्यांची पत्नी आहे.

४. अशा परिस्थितीत वादी व प्रतिवादी हे वाटपाप्रमाणे सदर सामाईक विहीरीचे पाणी हिस्से राशीप्रमाणे पिकांसाठी घेत असतात. दि.१८.१२.२०२४ रोजी सकाळी ११.३० चे सुमारास वादी क्रमांक ०१ सामाईक विहीरीवरील इलेक्ट्रिक मोटर चालु करण्यासाठी गेली असता प्रतिवादीने त्याच्या वायरी तोडल्याचे आढळुन आले. तसेच प्रतिवादींनी वादी क्रमांक ०१ हिस शिवीगाळ करुन येथे यायचे नाही असे सांगितले. म्हणुन तिने प्रतिवादींचे विरोधात सायखेडा पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा क्रमांक ७८२/२०२४ नोंदविला. त्यानंतर देखील दि.२५.१२.२०२४ रोजी व दि. १२.०१.२०२४ रोजी वादी त्यांचे सामाईक विहीरींचे मोटार चालु करण्यासाठी गेले असता प्रतिवादींनी त्यास हरकत अडथळा केला व विहीरीवर येवु देणार नाही अशी धमकी दिली. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादींच्या या वर्तनामुळे त्यांच्या गव्हाच्या पिकाचे पाण्या अभावी नुकसान होत आहे व प्रतिवादींना असे करण्यापासुन रोखले नाही तर भविष्यात देखील वादीचे कीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणुन वादींनी सदरचा अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

५. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी हजर होवुन निशाणी क्रमांक १६ अन्वये सदरच्या अर्जावर जबाब व दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे. त्यात प्रतिवादींनी वादींची सर्व प्रतिकुल कथने खरी व बरोबर नसल्याने मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीने वादीच्या स्पेशल मुकादमा क्रमांक २३२/१९९८ प्रमाणे समझोता झालेबाबतचे कथन मान्य केले आहे. परंतु प्रतिवादी असे कथन करतात की, सदर वाटपापुर्वी दावा मिळकत नंबर १३८ च्या क्षेत्रासाठी दगडु महादु गोहाड यांचे मालकीचे गट क्रमांक १४३ मध्ये पुर्वेस जगन्नाथ यशवंत कर्पे, अशोक सिताराम कर्पे व रखमाबाई अशोक कर्पे, दगडु महादु गोहाड अशा तिघांनी एकत्र येवुन सामाईक विहीर खोदण्याचा करारनामा दि.१७.११. १९८६ रोजी लिहुन व दुयम निबंधक साहेब, निफाड यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक २५६७/१९८६ अन्वये नोंदविला. त्याप्रमाणे गट क्रमांक १३८ च्या क्षेत्राकरीता दगडु महादु गोहाड यांचे गट क्रमांक १४३ मधील विहीरीत ११ पैशाच्या हिश्याने हक्क व अधिकार ठेवण्यात आला. सन १९८६ पासुन आजपावेतो गट क्रमांक १३८ करीता गट क्रमांक १४३ मधील विहीरीतुन पाण्याची सोय केलेली होती व आहे असे असताना देखील स्पे.मुकादमा क्रमांक २३२/१९९८ मध्ये सुलेनामा करतेवेळी दावा

मिळकत गट क्रमांक १३८ पैकी ० हे २ आर क्षेत्र विहीरीसाठी मयत जगन्नाथ व त्रंबक यांचेकरीता सामाईकात ठेवले.

६. अशी परिस्थिती असताना मयत जगन्नाथ याच्या वाटयाला आलेले गट क्रमांक १०६ मध्ये पाण्याची कमतरता असल्याने त्याने मयत त्रंबक याच्याकडे दावा मिळकतीतील ० हे २ आर सामाईक क्षेत्रात विहीर खोदण्यासाठी विचारणा केली असता त्रंबक याने दावा मिळकत गट क्रमांक १३८ चे क्षेत्रास गट क्रमांक १४३ मधील विहीरीतुन मिळणारे पाणी पुरेसे असल्याचे सांगुन विहीर करण्यास असमर्थतता दर्शविली व सदरील सामाईक ० हे २ आर क्षेत्र आपआपसांत वाटुन घेण्याचे सांगितले व त्याप्रमाणे ० हे १ आर क्षेत्र जगन्नाथ यास व ० हे १ आर क्षेत्र त्रंबक याने त्याचे गट क्रमांक १३८ मध्ये सामील करुन घेतले व मयत जगन्नाथ यास त्याचे ० हे १ आर क्षेत्रात विहीर करण्यास संमती दिली. त्यानुसार मयत जगन्नाथ व प्रतिवादींनी गट क्रमांक १३८ मधील त्यांचे ० हे १ आर क्षेत्रात सन २००१ ते २००४ पर्यंत विहीरीचे खोद काम केले व स्वत:चे नामे विदयुत कनेक्शन घेतले. तेव्हापासुन आज पावेतो सदरील पंपाचे बिल मयत जगन्नाथ व प्रतिवादी नियमितपणे भरत आहे. सदरच्या स्वतंत्र विहीरीवरुन प्रतिवादींनी गट क्रमांक १०६ मधील क्षेत्रास २००५ साली पाईपलाईन करुन घेतलेली आहे व तेव्हापासुन आजपावेतो अव्याहतपणे वापरत आहेत. मयत त्रंबक, वादी क्रमांक ०२ व प्रतिवादी यांचे चांगले संबंध होते व आहे. प्रतिवादी क्रमांक ०२ हे वादी क्रमांक ०२ चा स्वत:ची आई असले प्रमाणे सांभाळ करीत आहे. परंतु वादी क्रमांक ०२ त्यांना मुलगा नसल्याने सर्व मिळकत प्रतिवादी क्रमांक ०१ ला देवुन टाकतील या भितीने वादी क्रमांक ०१ ने प्रतिवादींना विनाकारण त्रास देण्यास व खोटया तक्रारी करण्यास विनाकारण सुरु केलेले आहे. तसेच प्रतिवादी असे कथन करतात की, वादी क्रमांक ०१ सदरची मिळकत विक्री करण्याच्या तयारीत असल्याने सदर प्रतिवादी हे हरकत करतील म्हणुन वादी क्रमांक ०१ ने सदरचा खोटा मनाई हुकुमाचा अर्ज व दावा दाखल केलेला आहे. वादीने स्वच्छ हाताने आलेले नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्याची प्रतिवादींनी विनंती केलेली आहे.

७. वादीतर्फे ॲड.आर.के. मोरे आणि प्रतिवादीतर्फे ॲड.श्री.एस.सी.वाघ यांचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न माझे

निर्णयाकरीता उपस्थित होतात. त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निर्णय** |
|---|---|---|
| १. | दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने असल्याची बाब सिध्द होते काय ? | **....होकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | **होकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजूर झाल्यास वादीला अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **होकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **...अर्ज मंजुर करण्यात आला.** |

:— **का र ण मि मां सा** :—

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करीता** :—

**८.** कायदयाच्या सिध्दांतानुसार तात्पुरत्या मनाईच्या अर्जावर निर्णय घेताना काही प्रमुख तत्वे विचारात घेतली जातात. जसे की, वादी यांना सकृतदर्शनी केस आहे काय, न्यायाचा व सोयीचा समतोल कोणाच्या बाजुने आहे आणि अर्ज मंजुर केल्यास कोणाचे नुकसान होईल आणि पक्षकारांचे आचरण मनाई आदेश देण्यास पात्र आहे काय हे मुदद्े विचारात घेणे आवश्यक आहेत. सदरहु मुदद्े एकमेकांशी सलग्न असल्याने चर्चेकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

**९.** वादीने त्याच्या अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्रमांक ०३ सोबत गट क्रमांक १३८ चा ७/१२ उतारा, फेरफार नोंद क्रमांक २०९७, ९२४ दाखल केलेले आहेत. तसेच वादीने स्पे.मुकादमा क्रमांक २३२/१९९८ च्या हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. वादीने अदखलपात्र गुन्हा नोंद क्रमांक ७८२/२०२३ ची स्थळप्रत दाखल केलेल आहे. निशाणी क्रमांक २२ सोबत वादीने फेरफार नोंद क्रमांक २०६५ व समाधान खालकर यांना दिलेले स्पेशन मुखत्यार पत्राची मुळ प्रत दाखल केलेली आहे. वादीच्या कथनांच्या पृष्ठयर्थ साक्षीदार रंगनाथ रामनाथ कर्पे यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

**१०.** प्रतिवादीने त्याचे जबाबाचे व कैफियतीचे समर्थनार्थ साक्षीदार ज्ञानेश्वर गोविंद गोहाड यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादीने करारनामा दस्त

क्रमांक २५६७/१९८६ ची सत्यापित प्रत दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादीने गट क्रमांक १३८ मधील विहीरीवरील इलेक्ट्रिक मोटारच्या विज देयकाचे बिल व गट क्रमांक १३८ मधील विहीरीचा फोटो दाखल केलेला आहे.

**११.** वादी असे युक्तीवाद करतात की, सदरची विहीर ही वादी व प्रतिवादी यांचे सामाईक हक्काची व वहिवाटीची असताना देखील प्रतिवादी हे वादीस विहीरीतुन पाणी काढण्यासाठी अडथळा करत आहे. त्यामुळे वादी यांच्या गव्हाच्या पिकाचे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादींना अडथळा करण्यापासुन रोखणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल. म्हणुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

**१२.** प्रतिवादी असा युक्तीवाद करतात की, वादींच्या क्षेत्रासाठी गट क्रमांक १४३ मधील विहीरीमधुन पाणी घेण्याची सोय समझोता होवुन हुकुमनामा होणेपुर्वीच केलेली आहे. त्याप्रमाणे मयत त्रंबक व वादी पुर्वीपासुन आजपावेतो त्याच विहीरीतुन पाणी घेत आहे. गट क्रमांक १३८ मधील विहीर प्रतिवादींचे पुर्वज मयत जगन्नाथ यांनी खोदलेली असुन ती फक्त प्रतिवादींचे मालकीची व वहिवाटीची आहे. त्यात वादींचा काही एक संबंध नाही. प्रतिवादींचे विधिज्ञ पुढे असा युक्तीवाद करतात की, मयत त्रंबक व मयत जगन्नाथ यांनी समझोता पत्राप्रमाणे सामाईक ठेवलेले ० हे २ आर क्षेत्र आपआपसात समान वाटुन घेतलेले आहे. त्याप्रमाणे मयत जगन्नाथ याने त्याचे हिश्यातील ० हे १ आर क्षेत्रात विहीर स्वखर्चाने बांधुन घेतलेली आहे. त्यामुळे वादींचा त्या विहीरीतील पाण्याची काही एक संबंध नाही.

**१३.** उभय पक्षकारांचा युक्तीवाद, वादींची कथने, प्रतिवादींचा जबाब व दाव्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, उभय पक्षकारांचे पुर्वज म्हणजेच मयत त्रंबक व मयत जगन्नाथ यांचेमध्ये स्पेशल मुकादमा क्रमांक २३२/१९९८ मध्ये वाटपाचा समझोता होवुन त्याप्रमाणे हुकुमनामा झालेला आहे. याबदद्ल उभय पक्षकारांमध्ये दुमत नाही. सदर हुकुमनाम्याप्रमाणे गट क्रमांक १३८ मध्ये ० हे २ आर क्षेत्र मयत त्रंबक व मयत जगन्नाथ यांचे करीता सामाईक विहीर करणेकामी सामाईकरित्या राखीव ठेवलेले होते. सदर हुकुमनाम्याप्रमाणे फेरफार नोंद क्रमांक ९२४ देखील प्रमाणित झालेली आहे. गट क्रमांक १३८ च्या ७/१२ उता—याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यात जलसिंचनाचे साधन या

रकान्यात विहीर असे नमुद आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, गट क्रमांक १३८ मध्ये विहीर आहे. फक्त ती विहीर वादी व प्रतिवादी यांची सामाईक विहीर आहे किंवा प्रतिवादींची वैयक्तिक मालकीची विहीर आहे हा वादाचा विषय आहे.

**१४.** वादीने पटलावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, स्पेशल मुकादमा क्रमांक २३२/१९९८ मध्ये झालेल्या हुकुमनाम्याप्रमाणे गट क्रमांक १३८ मधील ० हे २ आर क्षेत्र हे विहीर करण्याकरीता मयत त्रंबक व मयत जगन्नाथ यांचे सामाईकरित्या हिश्यास ठेवले होते. त्यामुळे प्रथमदर्शनी असे अनुमान निघते की, त्यातील विहीर देखील सामाईक विहीर असेल. कारण प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार जर हुकुमनाम्याच्या पुर्वीच गट क्रमांक १४३ मधील विहीरीतुन पाणी घेण्याबाबत करार झाला होता तर त्याबाबत हुकुमनाम्यात का नमुद नाही हे प्रतिवादी स्पष्ट करत नाही. शिवाय प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार जर गट क्रमांक १३८ मधील ० हे २ आर क्षेत्र मयत त्रंबक व मयत जगन्नाथ यांनी समानरित्या म्हणजेच ० हे १ आर प्रत्येकी वाटुन घेतले होते तर त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी पटलावर दाखल केलेला नाही. उभय पक्षकारांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठयर्थ साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत. परंतु सदर साक्षीदारांना शपथेवर तपासल्याशिवाय त्या प्रतिज्ञापत्रांची सत्यता पडताळणे अशक्य आहे. त्यामुळे गट क्रमांक १३८ मधील विहीर नक्की कोणी खोदली व ती नक्की कोणाच्या मालकीची व वहिवाटीची आहे हे कुठल्याही ठोस पुराव्याशिवाय ठरविणे या टप्प्यावर शक्य नाही. शिवाय प्रतिवादीने दाखल केलेल्या करारनाम्यात सदरचे वादींचे पुर्वज म्हणजेच मयत त्रंबक सामील नव्हते ही बाब देखील लक्षात घेणे गरजेचे आहे. याशिवाय गट क्रमांक १३८ मधील क्षेत्राचे पाण्याच्या गरजेकरीता गट क्रमांक १३८ मधील विहीर सोडुन वादी गट क्रमांक १४३ मधील विहीरीतुन पाणी घेत आहेत हे प्रतिवादीचे कथन संयुक्तीक वाटत नाही.

**१५.** वरील चर्चिलेल्या मुदद्यांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येत आहे की, गट क्रमांक १३८ मधील विहीर ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक विहीर आहे. सदर प्रतिवादींची कैफियत व जबाब पाहता प्रथमदर्शनी असे दिसुन येत आहे की, प्रतिवादी वादींना या सामाईक विहीरीतुन पाणी घेण्यास हरकत घेत आहेत. गट क्रमांक १३८ मधील जमिन ही शेतजमिन असल्याने त्यातील पिके घेण्यासाठी विहीरीतील पाणी

गरजेचे आहे. त्यामुळे जर सामाईक विहीरीतील पाणी घेण्यास वादीस हरकत व अडथळा झाला तर पिकांचे नुकसान होईल यात शंका नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादींकडुन वादींना सामाईक विहीरीतील पाणी घेण्यास हरकत व अडथळा करणेपासुन मज्जाव करणे आवश्यक आहे. प्रतिवादींची हरकत व अडथळा या अनुषंगाने वादींच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस दिसुन येत आहे. सध्यस्थितीत वादींना तथाकथीत सामाईक विहीरीचे पाणी घेण्यापासुन हरकत व अडथळा झाला तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल याउलट सदरची विहीर सामाईक असल्याने प्रतिवादी त्यातुन शेतीसाठी पाणी घेत आहेत त्यामुळे त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा व सोयीचा तराजु सुध्दा वादींच्या हितामध्ये आहे. परिणामी, मुदद्े क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवुन खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी किंवा त्यांचेतर्फे कोणीही इसम याने गट क्रमांक १३८ मधील सामाईक विहीरीमधुन पाणी घेण्यास वादीस हरकत व अडथळा करु नये तसेच विहीरीवर बसविलेल्या इलेक्ट्रिक मोटार च्या विदयुत वाहीनीची वायर तोडु नये असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात येत आहे.

३. खर्चाचा हुकुम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल.

४. येथे नमुद करणे आवश्यक आहे की, वरील आदेशातील नोंदविण्यात आलेल्या मुदद्यांचा अर्थ दाव्याच्या गुणवत्तेवर निर्णायक मत किंवा निष्कर्ष म्हणुन लावला जावु नये.

दि.२४.०४.२०२५

(एस.पी. देशपांडे),
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
निफाड